# वचनबद्धतेचे सामर्थ्य



आशीष रायचूर

केवळ विनामूल्य वितरणासाठी

ऑल पीपल्स चर्च अँड वर्ल्ड आउटरीच, बैंगलोर, भारतद्वारे मुद्रित व वितरित.

प्रथम संस्करण मुद्रित, संपर्क

All Peoples Church & World Outreach,
# 319, 2nd Floor, 7th Main, HRBR Layout,
2nd Block, Kalyan Nagar, Bangalore 560 043
Karnataka, INDIA

Phone: +91-80-25452617
Email: bookrequest@apcwo.org
Website: **apcwo.org**

अन्यथा सूचित केले नसल्यास, बायबलचे सर्व संदर्भ पवित्र बायबल, बायबल सोसायटी ऑफ इंडिया आवृत्तीतून घेण्यात आले आहेत. सर्व हक्क स्वाधीन.

बायबल व्याख्या, इब्री व ग्रीक शब्द तसेच त्यांचे अर्थ खालील पुस्तकांतून घेण्यात आले आहेत:

Thayer's Greek Definitions, Published in 1886,1889; public domain.
Strong's Hebrew and Greek Dictionaries, Strong's Exhaustive Concordance by James Strong, T. D.LLD. Published in 1890; public domain.
Vine's Complete Expository Dictionary of Old and New Testament Words @1984,1996, Thomas Nelson, Inc, Nashville, TN.

**आर्थिक साझेदारी**

या पुस्तकाचे विनामूल्य वितरण ऑल पीपल्स चर्चचे सदस्य, सहभागी आणि मित्रांच्या आर्थिक मदतीमुळे शक्य झाले आहे. जर आपण या विनामूल्य प्रकाशनाद्वारे आशीर्वाद प्राप्त केला असेल, तर आम्ही आपणास ऑल पीपल्स चर्चच्या विनामूल्य प्रकाषनांच्या मुद्रणासाठी तसेच वितरणासाठी आर्थिक अंशदान देण्यासाठी आमंत्रित करतो. कृपया **apcwo.org/give** वर जावे अथवा आपले दान कसे द्यावे हे पाहण्यासाठी या पुस्तकाच्या मागे ”ऑल पीपल्स चर्चसोबत भागिदारी“ हे पृष्ठ पाहावे. धन्यवाद!

**डाक यादी**

ऑल पीपल्स चर्चद्वारे विनामूल्य पुस्तके प्रकाशित झाल्यानंतर  आपण apcwo.org या संकेतस्थळावर देण्यात आलेल्या यादीत वर्गणीदार म्हणून आपले नाव दाखल करू शकता.

# अनुक्रमणिका

1. परिचय ........................................................................................................1
2. वचनबद्ध व्यक्तीची वैशिष्ट्ये ..........................................................................3
3. वचनबद्ध असण्याचे मोल ..............................................................................5
4. आपण वचनबद्ध आहात का? ........................................................................9

# वचनबद्धतेचे सामर्थ्य

# 1. परिचय

वचनबद्धता हा असा सद्‌गुण आहे जो आजच्या दिवसांत आढळून येणे अशक्य आहे, लौकिक जगात आणि मंडळीतही. आमच्यापैकी अनेक जण जे सोयीस्कर वाटते ते करू इच्छितात आणि वचनबद्ध लोकांचे आढळणे अशक्य आहे.

वचनबद्ध करणे म्हणजे काय? याचा अर्थ एखाद्या विशिष्ट कारणासाठी विश्वासू आणि निष्ठावान असणे. याचा अर्थ असा की आपल्यात जबाबदारीची भावना आहे. जेव्हा आपण मुद्दाम आणि न बदलणारी निवड आणि त्याचे पालन करतो तेव्हा आपण वचनबद्ध असतो. वचनबद्ध असणे म्हणजे एखाद्या गोष्टीकडे आपली तत्परता व्यक्त करणे.

उदाहरणार्थ, आपण बोलत असलेल्या शब्दांचा विचार करा. वेळेसंबंधाने आपण जी वचने देतो त्याविषयी विचार करा. आपण म्हणतो की आपण निश्चित वेळी एखाद्या व्यक्तीस भेटावयास जाऊ आणि मग त्याविषयी बेफिकर राहतो. आपण अर्धा तास उशिरा पोहोचू शकतो आणि विचार करतो की हे सर्वसामान्य आहे.

पण यावरून असे दिसून येते की आपण आपल्या शब्दांच्या बाबतीत वचनबद्ध नाही. जेव्हा आपण म्हणतो की आपण एखाद्याला निश्चित वेळी भेटू, तेव्हा आपण आपल्या शब्दांचे पालन केले पाहिजे. मला असे म्हणताना लाज वाटते की कधीकधी पाळक आणि परमेश्वराचे सेवक सुद्धा वेळेचे पालन करण्याबाबत निष्काळजी असतात. जर आपण परमेश्वराचे सेवक आहात, तर जे कोणते महत्त्वाचे क्षेत्र असेल जेथे आपण आपल्या शब्दांसंबंधाने वचनबद्धतेचे पालन करू शकता तर ते आहे वेळेच्या बाबतीत. जेव्हा आपण एखादी गोष्ट बोलता तेव्हा त्या बाबतीत गंभीर असा आणि तिचे पालन करण्याचा प्रयत्न करा.

बायबल आम्हाला वचनबद्ध राहण्याविषयी शिकविते. प्रभू येशूने म्हटले, “कोणीही दोन धन्यांची चाकरी करू शकत नाही, कारण तो एकाचा द्वेष करील व दुसऱ्यावर प्रीती करील; अथवा एकाशी निष्ठेने वागेल व दुसऱ्याला तुच्छ मानील. तुम्ही देवाची आणि धनाची चाकरी करू शकत नाही” (मत्तय

6:24). येशू येथे सूचित करतो की हा आमचा जन्मजात स्वभाव आहे. मनुष्य एकाच वेळी दोन गोष्टी पूर्ण करू शकत नाही ज्या एकमेकांच्या उलट आहेत. उदाहरणार्थ आपण परमेश्वराची आणि जगाची सेवा करू शकत नाही. आम्ही एकास दुसऱ्याच्या तुलनेत अधिक समर्पित राहू. एकाच वेळी जगाचा मित्र आणि परमेश्वराचा मित्र असणे शक्य नाही. "*अहो अविश्वासू लोकांनो,1 जगाची मैत्री ही देवाबरोबर वैर आहे, हे तुम्हांला ठाऊक नाही काय? जो कोणी जगाचा मित्र होऊ पाहतो तो देवाचा वैरी ठरला आहे*" (याकोब 4:4). आपण एक तर परमेश्वराचे मित्र ठरू अथवा जगाचे मित्र ठरू. आपण दुहेरी वचनबद्धता राखू शकत नाही. आम्हास एका स्वामीच्या बाबतीत वचनबद्ध राहावे लागेल. येशू आम्हास बोलावीत आहे की आम्ही त्याच्याप्रत वचनबद्ध असावे आणि ख्रिस्ताच्या मंडळीत मजबूत समर्पण किंवा वचनबद्धता निर्माण करावी. या पुस्तकात वचनबद्धतेच्या सामर्थ्यावर जोर देण्यात आला आहे आणि आपण जे काही करता त्यात वचनबद्ध राहण्यास ते आपणास प्रेरित करील.

# 2. वचनबद्ध व्यक्तीची वैशिष्ट्ये

आपण एखाद्या गोष्टीबाबत वचनबद्ध आहोत असे आपण कसे म्हणू शकतो?

## कुठलीही किंमत द्यावयास तयार

जर व्यक्ती परमेश्वराच्या पाचारणाबाबत वचनबद्ध असेल तर, ते पाचारण पूर्ण करण्यासाठी तो कुठलीही किंमत द्यावयास तयार राहील. काही लोक परमेश्वराची सेवा करू इच्छितात, पण ज्या ठिकाणी त्यांनी जावे असे परमेश्वरास वाटते त्याठिकाणी पोहोचण्यास ते तयार नसतात. जरी परमेश्वराजवळ आपल्या जीवनासाठी योजना आणि पाचारण आहे, तरीही सर्व काही आपोआप घडणार नाही. आपण परमेश्वराचे सहकारी आहात आणि काम करण्यासाठी कामकऱ्यांची गरज आहे! आपल्या जीवनात परमेश्वर आपले हेतू प्रकट करण्यासाठी त्याग करावयासाठी आपणास पाचारण करू शकतो. जेव्हा आपण परमेश्वराच्या हेतूंबाबत खरोखर वचनबद्ध असता, तेव्हा आपण त्यासाठी वाटेल ते करावयास तयार राहाल जे तो आपणास मागत आहे.

बायबल काही विश्वासणाऱ्यांविषयी म्हणते, “*त्याला त्यांनी कोकऱ्याच्या रक्तामुळे व आपल्या साक्षीच्या वचनामुळे जिंकले; आणि त्यांच्यावर मरायची पाळी आली तरी त्यांनी आपल्या जिवावर प्रीती केली नाही*” (प्रकटीकरण 12:11). हे लोक प्रभू येशू ख्रिस्तास इतके वचनबद्ध अथवा समर्पित होते की ते आपले जीवन त्यागावयास तयार होते. जर आपण प्रभू येशू ख्रिस्ताबद्दल वचनबद्ध असाल तर आपणास कुठलीही किंमत मोठी वाटणार नाही, जरी याचा अर्थ त्यासाठी आपल्या स्वामीकरिता आपले जीवन त्यागावे का लागेना.

## सर्व अडचणींवर विजय मिळविण्याची तयारी

जो व्यक्ती वचनबद्ध असतो तो त्या वचनाचे पालन करण्यासाठी सर्व अडचणींवर विजय मिळवण्यासाठी तयार असतो. तो सहज निराश होत नाही आणि तो सोयीस्कर मार्गाच्या शोधात राहत नाही. हा व्यक्ती दिलेल्या वचनाचे पालन करण्यासाठी अत्यंत दृढनिश्चय असतो. मार्गात कितीही

अडखळणे आली तरी तो पुढे वाढत जातो आणि आपल्या वचनाचे पालन करण्यासाठी आटोकाट प्रयत्न करतो. तथापि जो व्यक्ती खरोखर वचनबद्ध नाही तो व्यक्ती जर सोईस्कर वाटेल तरच आपल्या वचनाचे पालन करतो. जेव्हा परिस्थिती थोडी कठीण होत जाते, तेव्हा बदल करण्याची शक्यता असते यासाठी की जे वचन त्याने दिले त्याचे पालन करण्याची गरज भासू नये.

## वचनबद्धतेवर लक्ष केंद्रित करण्याची योग्यता

जेव्हा व्यक्ती वचनबद्ध असतो तेव्हा तो एकाग्रचित्त असतो आणि त्याचे लक्ष सहज विचलित होत नाही. पण जो व्यक्ती काही करावयास समर्पित नाही, वचनबद्ध नाही, तो जेथे सोईस्कर होईल तेथे जाईल.

**लूक 9:57-62**

**57 तेव्हा असे झाले की, ते वाटेने चालत असता कोणीएकाने त्याला म्हटले, "प्रभूजी, आपण जेथे कोठे जाल तेथे मी आपल्यामागे येईन."**

**58 येशू त्याला म्हणाला, "खोकडांना बिळे व आकाशातल्या पाखरांना घरटी आहेत; परंतु मनुष्याच्या पुत्राला डोके टेकायला ठिकाण नाही."**

**59 त्याने दुसऱ्या एकाला म्हटले, "माझ्यामागे ये;" परंतु तो म्हणाला, "प्रभूजी, पहिल्याने मला माझ्या बापाला पुरायला जाऊ द्या."**

**60 तो त्याला म्हणाला, "मेलेल्यांना आपल्या मेलेल्यांस पुरू दे; तू जाऊन देवाच्या राज्याची घोषणा कर."**

**61 त्यावर आणखी एकाने म्हटले, "प्रभूजी, मी आपल्यामागे येईन; परंतु पहिल्याने मला माझ्या घरच्या माणसांचा निरोप घेऊ द्या."**

**62 येशूने त्याला म्हटले, "जो कोणी नांगराला हात घातल्यावर मागे पाहतो तो देवाच्या राज्यास उपयोगी नाही."**

जी गोष्ट येशू आम्हाला समजावून सांगू इच्छित आहे ती ही आहे की जेव्हा आपण वचनबद्ध असतो आणि असे म्हणून आपण निर्णय घेतलेला असतो की, "प्रभू, मी तुझे अनुसरण करणार आहे," तेव्हा त्याविषयी कुठलेही दोन मार्ग राहत नाहीत. येशूप्रत आमची बांधिलकी किंवा वचनबद्धता आम्हास त्याच्यावर लक्ष्य केंद्रित करावयास आणि सर्व जगीक बंधने सैल करावयास प्रेरित करील. तथापि, येशू आम्हास असे सांगत नाही की आम्ही आपल्या कुटूंबास किंवा प्रियजनांस विसरून जावे. मुद्दा येथे हा आहे की जी व्यक्ती वचनबद्ध आहे ती एकाग्रचित्त असते. तिचे लक्ष विचलित होत नाही, महत्वपूर्ण कौटुंबिक जबाबदाऱ्यांद्वारे सुद्धा नाही.

# 3. वचनबद्ध असण्याचे मोल

वचनबद्ध असण्याचे मोल काय आहे? जेव्हा प्रत्येक जण जे सोईस्कर वाटेल ते करीत असतो, तेव्हा तुम्ही आणि मी वेगळे राहून वचनबद्ध लोक का बनावे? वचनबद्ध असण्याचे काय फायदे आहेत?

## बळ, स्थैर्य, आणि निश्चितता

वचनबद्ध असण्याद्वारे आमच्या जीवनात अशा प्रमाणात बळ, स्थैर्य, आणि निश्चितता येते की ती आम्हावर येणाऱ्या कठीण समयांतही आम्हास अढळ करील.

**याकोब 1:8**
**असा माणूस द्विबुद्धीचा असून आपल्या सर्व कार्यांत चंचल असतो.**

विश्वासाने प्रार्थना कशी करावी हे आम्हाला शिकविल्यानंतर, याकोब द्विबुद्धी व्यक्तीविषयी एक सामान्य विधान करून आपल्या शिकवणीचा सारांश मांडतो. द्विबुद्धी व्यक्ती अस्थिर आणि अविश्वसनीय असते. तथापि, या उलट देखील खरे आहे. स्थिरचित्त व्यक्ती - ज्याने आपल्या “मनाचा निर्धार” केला आहे, जो व्यक्ती वचनबद्ध आहे - तो स्थिर आणि अढळ राहील.

## आशीर्वाद

जो व्यक्ती वचनबद्ध नाही त्या व्यक्तीच्या तुलनेत जो व्यक्ती वचनबद्ध आहे तो अधिक प्रमाणात लाभ आणि आशीर्वाद प्राप्त करील आणि त्यांचा अनुभव घेईल.

**नीतिसूत्रे 28:20**
**स्थिर मनाच्या मनुष्याला आशीर्वादांची रेलचेल होते.**

विश्वासयोग्य किंवा विश्वसनीय व्यक्ती वचनबद्ध असतो. त्याची संपूर्ण अंतःकरणाने केलेली वचनबद्धता त्याला विश्वसनीय ठरविते. जो व्यक्ती अपूर्ण मनाने एखादे काम करतो तो त्याच्या कामाचा तितका आनंद अनुभवणार नाही जितका ते संपूर्ण अंतःकरणाने करणारा अनुभव करील. यात शंका नाही की जो व्यक्ती ते संपूर्ण अंतःकरणाने करतो तो चांगले काम करील आणि त्याला त्यापेक्षा उत्तम फळ प्राप्त होईल.

भौतिक शरीराचा विचार करा. परमेश्वराचा हेतू हा होता की शरीराच्या सर्व अवयवांनी एकत्र जुळलेले असावे, यासाठी की त्यांनी एक एकक म्हणून कार्य करावे. आज आपण आपल्या शरीरास आपला हात जुळलेला पाहतो, आणि नंतर त्याला जवळपास तरंगतांना पाहतो व उद्या आणखी कोणाच्या शरीराचा अवयय बनतांना पाहतो असे होत नाही. आपण हे सुद्धा पाहत नाही की आज आपले हृदय आपल्या अंतःकरणात धडधडत आहे आणि उद्या आणखी कोणाच्या शरीरात ते धडधडू लागेल. जर परमेश्वराने आमच्या शरीराचे अवयय विस्कळीत आणि स्वतंत्रपणे काम करीत असलेले घडविले असते, तर आमच्या शरीराचे अवयय सभोवताली तरंगत असते - हृदय, फुफ्फुस, हात, डोळे. अधूनमधून, यापैकी काही अवयव एकत्र येऊन काही करीत असते आणि नंतर वेगळे झाले असते. हे अत्यंत हास्यास्पद वाटते आणि आम्ही परमेश्वराचे उपकार मानतो की आमच्या शरीरांस असे कार्य करण्यासाठी घडविण्यात आलेले नाही. जरी वैद्यकशास्त्राने शरीराच्या काही निश्चित अंगांचे प्रत्यारोपण शक्य केले आहे, तरीही सामान्य नियम हा आहे की आपल्या शरीराचा प्रत्येक अवयय जेव्हा आपल्या शरीरास ”वचनबद्ध“ अथवा समर्पित असतो आणि आपल्या शरीराच्या इतर अंगांस जोडलेला असतो तेव्हा तो चांगल्याप्रकारे काम करतो. आपले शरीर एकत्र मिळवून बरेच काही करू शकते आणि साध्य करू शकते.

भौतिक शरीराजवळ स्थानिक मंडळीविषयी आमच्यासाठी एक “संदेश” आहे, जो ख्रिस्ताच्या संपूर्ण मंडळीचा भाग आहे. जेव्हा आपण स्थानिक मंडळीचा विचार करतो, तेव्हा आपणास एक सामान्य दृश्य दिसून येते की लोक एका मंडळीतून दुसर्या मंडळीत उड्या मारीत फिरतात. परमेश्वराच्या लोकांनी आपले ख्रिस्ती जीवन असे घालवावे ही परमेश्वराची योजना नाही. प्रत्येक विश्वासणाऱ्यास स्थानिक मंडळीप्रत वचनबद्ध राहण्याची गरज आहे जेथे त्याला वाटते की परमेश्वराने तेथे राहण्यासाठी त्याला पाचारण केले आहे. आम्हाला विश्वासणाऱ्याच्या स्थानिक मंडळीप्रत वचनबद्ध राहण्याची गरज आहे जेथे परमेश्वराने आम्हाला ठेवले आहे. जेव्हा आम्ही स्थानिक मंडळीप्रत विश्वासू राहू तेव्हा आपणास

त्या मंडळीचे पूर्ण अवयय असण्याच्या पूर्ण आशीर्वादंाचा अनुभव येईल. जे केवळ इकडेतिकडे उड्या मारत फिरतात, ते फारसे काही करणार नाहीत, काही करण्यासाठी त्यांची मदतही होणार नाही!

जेव्हा आपण वचनबद्ध असतो, केवळ तेव्हाच आपण दीर्घकालीन आशीर्वाद आणि लाभ प्राप्त करू शकतो. आमच्यापैकी अनेकांस केवळ “रविवार पहाटेचे मनोरंजन” हवे असते आणि म्हणूनच आपण एका मंडळीतून दुसऱ्या मंडळीत उड्या मारत फिरतो. आम्हाला वाटते की पाळकाने तोच संदेश द्यावा जो आम्ही ऐकू इच्छितो. पण जर पाळक प्रभूच्या वचनाचा प्रचार करीत असेल - तर आम्हास बहुधा काहीतरी वेगळे ऐकावयास हवे असते - आमचे समर्पण अथवा वचनबद्धता खिडकीतून बाहेर उडून जाते आणि आम्ही दारातून बाहेर पडतो! जर आम्हाला दीर्घकालीन लाभ आणि आशीर्वाद हवे असतील, तर आम्ही स्थानिक मंडळीस, कामास समर्पित असले पाहिजे, आणि तेथे सेवा केली पाहिजे.

## प्रतिफळ

**इब्री. 11:6**
**त्याचा शोध झटून करणाऱ्याना तो प्रतिफळ देणारा आहे.**

आम्ही यत्नपूर्वक त्याचा शोध घ्यावा. परमेश्वराचा शोध घेण्यात एक वचनबद्धता आहे. आम्ही परमेश्वराचा शोध घेण्याबाबत वचनबद्ध आहोत का अथवा आपण केवळ त्याच वेळी परमेश्वराचा शोध घेतो जेव्हा आमच्याजवळ फुरसतीची वेळ असते? आपण प्रार्थनेत वेळ घालविण्याबाबत आणि परमेश्वराच्या वचनचा अभ्यास करण्याबाबत वचनबद्ध आहोत का अथवा वेळ असल्यास आम्ही परमेश्वराचा धावा करतो. बायबल म्हणते की त्याचा शोध झटून करणाऱ्याना तो प्रतिफळ देतो, त्यांना नाही जे सोईस्कर वाटेल तेव्हा त्याचा शोध घेतात. जो व्यक्ती वचनबद्ध आहे तो त्याच्या जीवनासाठी परमेश्वराच्या प्रतिफळांचा अनुभव घेईल.

### प्रगती

**1 तीमथ्य. 4:15**
**तुझी प्रगती सर्वांना दिसून यावी म्हणून तू ह्या गोष्टींचा अभ्यास ठेव; ह्यांत गढून जा.**

आम्ही हा सिद्धांत आमच्या जीवनांत सुद्धा लागू करू शकतो. आपण परमेश्वराचे सेवक होण्यास वचनबद्ध असावे, पीक कापावयास बचनबद्ध, इतर विश्वासणाऱ्यांसाठी कित्ता बनण्यास वचनबद्ध, आणि मंडळीचे नेतृत्व करण्याच्या जबाबदारीस वचनबद्ध असावे. जेव्हा आपण अशाप्रकारे वचनबद्ध असतो, तेव्हा आमची प्रगती दिसून येते. जो व्यक्ती अपूर्ण मनाने कार्य करतो, तो कुंठीत राहील. जेव्हा आपण स्वतःस - आत्मा, प्राण, शरीर - आपल्यापुढे असलेल्या कामासाठी पूर्णपणे वाहून देतो, तेव्हाच आपली प्रगती होईल आणि लोकांस ती दिसून येईल.

## 4. आपण वचनबद्ध आहात का?

जर कोणी आमच्या वचनबद्धतेविषयी आम्हाला प्रश्न केला, तर आम्ही कदाचित त्वरित उत्तर देऊ की आम्ही वचनबद्ध आहोत. कदाचित या प्रश्नांची उत्तरे आमच्या वचनबद्धतेच्या व्यापावर आणखी प्रकाश टाकतील.

- आम्ही वचनबद्ध लोक आहोत का अथवा आपण सोयीनुसार जीवन घालवितो?
- जे योग्य आहे ते करण्यास आपण वचनबद्ध आहोत का? आपण सर्व वेळ, सर्वत्र, प्रत्येक परिस्थितीत योग्य ते करावयास वचनबद्ध आहोत का अथवा आम्ही आमच्या सोयीनुसार तडजोड करतो आणि आपले स्थान बदलतो?
- आम्ही प्रभू येशू ख्रिस्ताप्रत, आमच्या स्थानिक मंडळीप्रत, आणि ख्रिस्ताच्या देहाप्रत वचनबद्ध आहोत का?
- आम्ही आमच्या जोडीदाराप्रत, वैवाहिक जीवनाप्रत, आणि कुटूंबाप्रत वचनबद्ध आहोत का? जीवनातील 'उतार-चढावात' आम्ही आपल्या जोडीदारावर प्रीती करणार का?
- आम्ही दिलेल्या वचनांचे पालन करण्याप्रत आम्ही वचनबद्ध आहोत का?
- आम्ही आपल्या कायस्थळाप्रत, आमच्या अधिकार्याप्रत, सहकार्यांप्रत आणि आपल्या मित्रांप्रत वचनबद्ध आहोत का?
- परमेश्वरासोबत वेळ घालविण्याबाबत आम्ही वचनबद्ध आहोत का?

प्रभू येशू ख्रिस्ताप्रत आमची वचनबद्धता किती गंभीर आहे? प्रभू येशूने म्हटले, *"आणि माझ्या नावामुळे सर्व लोक तुमचा द्वेष करतील; तथापि जो शेवटपर्यंत टिकेल तोच तरेल"* (मत्तय 10:22). जेव्हा सोईस्कर आणि सोपे असते तेव्हा आम्ही येशू ख्रिस्ताप्रत वचनबद्ध असतो अथवा शेवटपर्यंत त्याचे अनुसरण करावयास आम्ही वचनबद्ध आहोत, लोक आमचा तिरस्कार करीत असतांनाही? येशू ख्रिस्ताप्रत आमची वचनबद्धता किंवा बांधिलकी किती गंभीर आहे?

आमच्या स्थानिक मंडळीप्रत आमची वचनबद्धता काय आहे? जेव्हा उत्तम संगीत, उत्तम संदेश असतो, आणि सर्वकाही शांत आणि सहज घडत असते तेव्हा आम्ही आमच्या स्थानिक मंडळीप्रत वचनबद्ध असतो किंवा मंडळी जेव्हा वादळी वातावरणातून जात असते तेव्हा सुद्धा आम्ही तिच्याप्रत वचनबद्ध राहतो? तरीही आम्ही मंडळीत टिकून राहू किंवा आम्ही दुसऱ्या मंडळीच्या शोधात जाऊ?

ऑल पीपल्स चर्चमध्ये, आम्ही बाहेर जाऊन येशू ख्रिस्ताची सुवार्ता सांगण्याबाबत वचनबद्ध आहोत. जेव्हा आम्ही बाहेर जाऊन येशूविषयी सुवार्ता सांगतो, तेव्हा सहजच आम्ही लोकांचे लक्ष वेधून घेतो. आम्हाला छळास देखील तोंड द्यावे लागू शकते. स्थानिक मंडळी छळातून जात असतांना आपण तिच्यात टिकून राहू किंवा आपण आणखी कुठल्या मंडळीत जाऊ? आपण असे म्हणू का, “प्रभू, माझा विश्वास आहे की मी या मंडळीचा भाग आहे आणि जर या मंडळीचा छळ होत असेल, तर मी तिच्याप्रत वचनबद्ध राहीन आणि आमच्या मार्गात येणाऱ्या सर्व संकटांना तोंड देईन?” जर आपण अशा स्थानिक मंडळीच्या शोधात असाल जेथे सर्वकाही चांगले आणि सोपे आहे आणि तिचा कधीही छळ होणार नाही, तर ऑल पीपल्स चर्च आपणासाठी नाही. पण जर आपण अशा मंडळीच्या शोधात असाल जी न लाजता येशूची सुवार्ता सांगेल आणि असे करण्यासाठी तिचा छळ केला जाऊ शकतो, आणि आपण अशा मंडळीच्या शोधात आहा जेथे येशू ख्रिस्ताच्या नावासाठी आपणास कठीण परिस्थितीचा अनुभव घडू शकतो, तर ऑल पीपल्स चर्चमध्ये आपले स्वागत आहे!

परमेश्वराने आम्हास आज्ञा दिली आहे की आम्ही जाऊन सुवार्ता गाजवावी, लोकांना अंधकारातून त्याच्या अद्‌भुत प्रकाशात आणावे. असे करीत असतांना, सैतान शांत राहणार नाही. तथापि, स्थानिक मंडळीचा भाग होण्यासाठी, आपण छळ सोसण्यासाठी तयार असले पाहिजे आणि दृढ होत जावे. ही आमची बांधिलकी अथवा वचनबद्धता असावी. मंडळी या नात्याने परमेश्वराने आम्हास दिलेल्या दृष्टांताप्रत आपण वचनबद्ध असले पाहिजे.

आपण मंडळीच्या इतर सदस्यांस वचनबद्ध आहोत का? आम्ही एकमेकाची काळजी वाहतो का? आम्ही एकमेकावर प्रीती करतो का?

आमच्या शहरातील मंडळीप्रत आम्ही वचनबद्ध आहोत का? जर आम्ही आमच्या शहरातील मंडळयांप्रत आणि परमेश्वराने तयार केलेल्या पाळकांप्रत/सेवकांप्रत वचनबद्ध आहोत, तर आम्ही

त्यांची निंदा करणार नाही. आम्ही नेहमीच त्यांच्या हिताचा आणि कल्याणाचा विचार करू. कोणी पडले, अडखळले, चूक केली तरीही आम्ही त्याच्यासाठी प्रार्थना करून, त्यांना सोडून देणार नाही.

आम्ही आमच्या जीवनासाठी परमेश्वराच्या स्वप्नांस, दृष्टांतांस, आणि पाचारणास वचनबद्ध आहोत का? बायबल आम्हास सांगते, *म्हणून माझ्या प्रिय बंधूंनो, प्रभूमध्ये तुमचे श्रम व्यर्थ नाहीत हे तुम्ही जाणून आहात; म्हणून तुम्ही स्थिर व अढळ व्हा आणि प्रभूच्या कामात सर्वदा अधिकाधिक तत्पर असा* (1 करिंथ 15:58). प्रभूच्या कार्यास नेहमी वचनबद्ध असावे कारण आपणास माहीत आहे की प्रभूमधील आपले कार्य व्यर्थ नाही.

**प्रकटीकरण 3:15-16**

**15 तुझी कृत्ये मला ठाऊक आहेत; तू शीत नाहीस व उष्ण नाहीस. तू शीत किंवा उष्ण असतास तर बरे होते;**

**16 पण तू तसा नाहीस, कोमट आहेस; म्हणजे उष्ण नाहीस, शीत नाहीस, म्हणून मी तुला आपल्या तोंडातून ओकून टाकणार आहे.**

आम्हास तप्त वचनबद्धतेची गरज आहे. जर आमची वचनबद्धता अथवा बांधिलकी कोमट असेल तर 'काही कामे' सुरू ठेवणे पुरेसे नाही. आमच्या अगदी उत्तम कार्यक्रमांचा जन्म जर प्रभू येशू ख्रिस्ताप्रत तप्त वचनबद्धतेतून झाला नसेल, तर ते निरूपयोगी ठरतील. आम्हास एकतर उष्ण निर्णय घ्यावे लागतील किंवा थंड.

प्रभू येशूने आम्हास सावधगिरीचा इशारा दिला की शेवटच्या दिवसांत अनेकांची प्रीती थंडावेल. *"आणि अनीती वाढल्यामुळे पुष्कळांची प्रीती थंडावेल. परंतु जो शेवटपर्यंत टिकून राहील तोच तरेल"* (मत्तय 24:12-13). येशू ख्रिस्ताप्रत आपली बांधिलकी अथवा वचनबद्धता आपणास शेवटपर्यंत टिकून राहण्यास सामर्थ्य देईल.

ही घटका आता वचनबद्ध राहण्याची आहे!

# ऑल पीपल्स चर्चसोबत भागिदारी

ऑल पीपल्स चर्च स्थानिक मंडळयांच्या रूपात संपूर्ण भारत देशात, विशेषतः उत्तर भारतात सुवार्ता गाजवीत आपल्या सरहद्दीपलीकडे सेवा करीत आहे. त्याचे विशेष ध्येय (अ) पुढाऱ्यास स्थिर करणे, (ब) तरूणांस सेवेसाठी सुसज्ज करणे आणि (क) ख्रिस्ताच्या मंडळीची वाढ करणे आहे. तरूणांसाठी प्रशिक्षण सम्मेलन, ख्रिस्ती पुढाऱ्यासाठी सभांचे संपूर्ण वर्षभर आयोजन केले जाते. याशिवाय, पुस्तकांच्या कित्येक हजारो प्रतींचे इंग्रजी आणि इतर अनेक भारतीय भाषांत विनामूल्य वितरण केले जाते, त्यामागे हेतू हा आहे की विश्वासणाऱ्यास वचन आणि आत्म्यात वाढ करून द्यावी.

आम्ही आपणास निमंत्रण देतो की एका वेळेचे दान पाठवून किंवा मासिक आर्थिक दान पाठवून आर्थिकरित्या आमच्यासोबत भागिदारी करावी. संपूर्ण राष्ट्रात हे कार्य करता यावे म्हणून जी दानराशी आपण पाठवू शकता, त्यासाठी आम्ही आपले आभारी राहू.

आपण आपल्या देणग्या चेक/बैंक ड्राफ्टच्या द्वारे "ऑल पीपल्स चर्च, बेंगलोर" च्या नावावर आमच्या कार्यालयाच्या पत्त्यावर पाठवू शकता किंवा खालील माहितीच्या आधारे आमच्या बँक खात्यात टाकू शकता: अतिरिक्त तपशीलासाठी कृपया या संकेतस्थळास भेट द्या - apcwo.org/give

Account Name: All Peoples Church
Account Number: 0057213809
IFSC Code: CITI0000004
Bank: Citibank N.A., No. 5, M.G. Road, Bengaluru, Karnataka 560001

कृपया लक्षात ठेवाः ऑल पीपल्स चर्चजवळ एफसीआरए परमिट नाही. या कारणास्तव केवळ भारतीय नागरिकांचे बँक अंशदान स्वीकार करता येणार नाही. आपली देणगी पाठवीत असतांना, स्पष्टपणे लिहा की आपण एपीसी सेवेच्या कोणज्या क्षेत्रासाठी दान पाठवू इच्छिता.

त्याचप्रमाणे, आमच्यासाठी व आमच्या सेवाकार्यासाठी शक्य तेव्हा प्रार्थना करणे विसरता कामा नये.

**धन्यवाद आणि परमेश्वर देव आपणास आशीर्वादित करो!**

## FREE PUBLICATIONS

A Church in Revival*
A Real Place Called Heaven
A Time for Every Purpose
Ancient Landmarks*
Baptism in the Holy Spirit
Being Spiritually Minded and Earthly Wise
Biblical Attitude Towards Work
Breaking Personal and Generational Bondages
Change*
Code of Honor
Divine Favor*
Divine Order in the Citywide Church
Don't Compromise Your Calling*
Don't Lose Hope
Equipping the Saints
Foundations (Track 1)
Fulfilling God's Purpose for Your Life
Gifts of the Holy Spirit
Giving Birth to the Purposes of God*
God Is a Good God
God's Word—The Miracle Seed
How to Help Your Pastor
Integrity
Kingdom Builders
Laying the Axe to the Root
Living Life Without Strife*
Marriage and Family
Ministering Healing and Deliverance
Offenses—Don't Take Them
Open Heavens*
Our Redemption
Receiving God's Guidance
Revivals, Visitations and Moves of God
Shhh! No Gossip!
Speak Your Faith *
The Conquest of the Mind
The Father's Love
The House of God
The Kingdom of God
The Mighty Name of Jesus *
The Night Seasons of Life
The Power of Commitment*
The Presence of God
The Redemptive Heart of God
The Refiner's Fire
The Spirit of Wisdom, Revelation and Power*
The Wonderful Benefits of speaking in Tongues
Timeless Principles for the Workplace
Understanding the Prophetic
Water Baptism
We Are Different*
Who We Are in Christ
Women in the Workplace
Work Its Original Design

वरील सर्व पुस्तके पीडीएफ आवृत्तीत विनामूल्य डाऊनलोडसाठी आमच्या चर्चच्या संकेतस्थळावर apcwo.org/books उपलब्ध आहेत. यापैकी काही पुस्तके इतर भाषांतही उपलब्ध आहेत. ह्या पुस्तकांची विनामूल्य मुद्रित प्रत प्राप्त करण्यासाठी ई-मेल या डाकद्वारे आमच्याशी संपर्क करावा. तसेच, विनामूल्य ऑडियो आणि विडियो संदेश, संदेशाचे नोट्स टी.वी. कार्यक्रम आणि इतर अनेक सामुग्रींसाठी आमच्या संकेतस्थळास भेट द्यावी: **apcwo.org**

# ऑल पीपल्स चर्च

बँगलोर शहरात मीठ आणि प्रकाश ठरावे, आणि भारत देशात तसेच संपूर्ण जगातील राष्ट्रांत एक आवाज़ बनणे हा ऑल पीपल्स चर्च (एपीसी) चा दृष्टांत आहे.

एपीसीमध्ये आम्ही देवाचे संपूर्ण वचन कुठल्याही प्रकारची तडजोड न करता, पवित्र आत्म्याच्या अभिषेकाने व प्रकटीकरणाने सादर करण्याप्रत वचनबद्ध आहोत. आमचा विश्वास आहे की उत्तम संगीत, रचनात्मक सादरीकरण, बुद्धिमत्तापूर्ण तत्वसमर्थन, समकालीन सेवाकार्याच्या पद्धती, आधुनिक तंत्रज्ञान इत्यादी गोष्टी पवित्र आत्म्याची चिन्हे, चमत्कार, अद्‌भुत कार्ये, आणि पवित्र आत्म्याच्या कृपादानांद्वारे वचनाची घोषणा करण्याच्या देवाने नेमलल्या पद्धतीची जागा घेऊ शकत नाहीत (1 करिंथ 2:4-5; इबी. 2:3-4). आमचा विषय येशू आहे, आमची विषयवस्तु वचन आहे, आमची पद्धत पवित्र आत्म्याचे सामर्थ्य आहे, आमचा आवेश लोक आहेत, आणि आमचे ध्येय ख्रिस्तासमान परिपक्वता आहे.

आमचे मुख्यालय बँगलोर येथे आहे, पण ऑल पीपल्स चर्चच्या भारतात कित्येक ठिकाणी शाखा आहेत. ऑल पीपल्स चर्चची वर्तमान यादी आणि संपर्क सूचना यासाठी आमच्या संकेतस्थळास भेट द्यावी: **www.apcwo.org/locations** किंवा या पत्त्यावर ई-मेल पाठवावा रू contact@apcwo.org

# आपणास माहीत आहे का की देव आपणावर प्रीती करतो?

सुमारे 2000 वर्षांपूर्वी, देव मानव म्हणून या जगात आला. त्याचे नाव येशू आहे. तो सिद्ध पापरहित जीवन जगला. येशू हा देहधारी परमेश्वर होता, म्हणून जे काही त्याने म्हटले आणि केले, त्याद्वारे त्याने देवास आमच्यावर प्रगट केले. तो जी वचने बोलला, तो देवाची वचने बोलला. त्याने जी कार्ये केली, ती देवाची कार्ये होती. येशूने पृथ्वीवर अनेक चमत्कार केले. त्याने रोग्यांस व क्लेशितांस बरे केले. त्याने आंधळ्यांचे डोळे उघडले, लंगड्यांस चालविले आणि प्रत्येक प्रकारचे रोग व आजार त्याने बरे केले. भाकरीच्या तुकड्यास आश्चर्यजनकरित्या बहुगुणित करून त्याने भुकेल्यास अन्न दिले, वादळ शांत केले आणि इतर अनेक अद्भुत गोष्टी केल्या.

**ह्या सर्व गोष्टी आम्हास प्रगट करतात की देव चांगला परमेश्वर आहे ज्याची इच्छा आहे की लोकांनी बरे, स्वस्थ, आरोग्यसंपन्न आणि आनंदित असावे. देव लोकांच्या गरजा पूर्ण करू इच्छितो.**

तर, देवाने मनुष्य बनण्याचा आणि आमच्या जगात प्रवेश करण्याचा निर्णय का घ्यावा? येशू का आला?

आम्ही सर्वांनी पाप केले आहे आणि अशा गोष्टी केल्या आहेत ज्या आम्हास उत्पन्न करणाऱ्या देवासमोर अमान्य आहेत. पापाचे परिणाम आहेत. पाप हे देव आणि मानवातील एका मोठ्या भिंतीसारखे आहे जी पार करता येत नाही. पाप हे आम्हास देवापासून वेगळे करते. ज्याने आम्हास उत्पन्न केले आहे त्यास जाणण्याच्या आणि त्याच्यासोबत अर्थपूर्ण नाते स्थापन करण्याच्या मार्गात ते आम्हास अडखळण आणते. म्हणून, आमच्यापैकी कित्येक जण इतर गोष्टींनी हे रिक्त स्थान भरून टाकण्याचा प्रयत्न करतात.

आमच्या पापांचा दुसरा परिणाम देवापासून सदाकाळसाठी अलग होणे होय. देवाच्या न्यायालयात, पापाचे वेतन मरण आहे. मृत्यू देवापासून दूर नरकात सार्वकालिक ताटातूट आहे.

पण, सुवार्ता ही आहे की आपण पापांपासून मुक्त राहू शकतो आणि देवाशी पुन्हा नाते स्थापन करू शकतो. बायबल म्हणते, **"पापाचे वेतन मरण आहे, पण देवाचे कृपादान आपल्या प्रभु येशू ख्रिस्तामध्ये सार्वकालिक जीवन आहे" (रोमियों 6:23).** येशूने जेव्हा वधस्तंभावर जेव्हा आपला प्राण दिला, तेव्हा त्याने संपूर्ण जगाच्या पापांची किंमत चुकविली, मग तीन दिवसानंतर तो पुन्हा जीवंत झाला, त्याने अनेकांस स्वतःला जीवंत दाखविले आणि मग तो स्वर्गास परतला. देव प्रीती आणि दयेचा देव आहे. त्याची अशी इच्छा नाही की कोणीही व्यक्तीने नरकात नाश व्हावे. म्हणून तो संपूर्ण मानवजातीस पापापासून आणि त्याच्या स्थायी परिणामांपासून मुक्त होण्याचा मार्ग दाखवावयास आला. तो पाप्यांस तारावयास—आपल्यासाख्या आणि माझ्यासारख्या लोकांस पापापासून आणि सार्वकालिक मृत्यूपासून वाचवावयास आला.

पापांची ही विनामूल्य क्षमा प्राप्त करण्यासाठी, बायबल आम्हास सांगते की आम्ही फक्त एक गोष्ट केली पाहिजे - प्रभु येशू ख्रिस्ताने वधस्तंभावर जे काही केले त्याचा स्वीकार करणे आणि संपूर्ण अंतःकरणाने त्याच्याठायी विश्वास धरणे.

**“त्याच्यावर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येकाला त्याच्या नावाने क्षमा मिळेल अशी साक्ष सर्व संदेष्टे त्याच्याविषयी देतात” (प्रेषितांची कृत्ये 10:43).**

**“की येशू प्रभु आहे असे जर तू आपल्या मुखाने कबूल करशील आणि देवाने त्याला मेलेल्यांतून उठविले असा आपल्या अंतःकरणात विश्वास ठेवशील तर तुझे तारण होईल” (रोम. 10:9).**

जर आपण प्रभु येशू ख्रिस्ताठायी विश्वास ठेवला, तर आपण देखील पापांपासून क्षमा प्राप्त करू शकता आणि शुद्ध होऊ शकता.

प्रभु येशू ख्रिस्तामध्ये आणि वधस्तंभावर त्याने आपणासाठी जे काही केले आहे त्याच्यावर विश्वास करण्याचा निर्णय घेण्यात आपली मदत करण्यासाठी खाली एक सोपी प्रार्थना दिलेली आहे. येशूने आपणासाठी काय केले आहे त्याच्या स्वीकार व्यक्त करण्यात आणि आपल्या पापांपासून शुद्धता प्राप्त करण्यात ही प्रार्थना आपली मदत करील. ही प्रार्थना केवळ एक मार्गदर्शक आहे. आपण आपल्या शंब्दांत देखील प्रार्थना करू शकता.

प्रिय प्रभु येशू, आज मला कळले की वधस्तंभावर तू माझ्यासाठी काय केले. तू माझ्यासाठी मरण पत्करलेस: तू तुझे बहुमूल्य रक्त वाहिलेस आणि माझ्या पापांचा दंड चुकविलास, यासाठी की मला क्षमा प्राप्त व्हावी. बायबल मला सांगते की जो कोणी तुजवर विश्वास ठेवील, त्याला त्याच्या पापांची क्षमा केली जाईल.

आज, मी तुजवर विश्वास ठेवण्याचा निर्णय घेतो आणि वधस्तंभावर माझ्यासाठी मरण पत्करून व पुन्हा मेलेल्यांतून जीवंत होऊन जे काही माझ्यासाठी केलेस, त्याचा मी स्वीकार करतो. मी जाणतो की माझ्या सत्कृत्यांद्वारे मी स्वतःचे तारण साध्य करू शकत नाही, इतर कोणीही मनुष्य माझे तारण घडवून आणू शकत नाही. मी माझ्या पापांची क्षमा कमवू शकत नाही.

आज, मी आपल्या अंतःकरणात विश्वास धरतो आणि माझ्या मुखाने हे कबूल करतो की तू मजसाठी मरण पत्करलेस, तू माझ्या पापांची किंमत चुकविलीस, तू पुन्हा मेलेल्यांतून उठलास, आणि तुझ्यावरील विश्वासाद्वारे, मला माझ्या पापांची क्षमा आणि शुद्धता प्राप्त होते. येशू, मी तुझे उपकार मानतो. तुजवर प्रीती करण्यात, तुला आणखी जाणून घेण्यात, आणि तुझ्याप्रत विश्वासू राहण्यात माझी मदत कर. आमेन.

# ऑल पीपल्स चर्च बायबल कॉलेज आणि सेवा प्रशिक्षणकेंद्र

ऑल पीपल्स चर्च बाइबल कॉलेज आणि सेवा प्रशिक्षणकेंद्र (एपीसी-बीसी) भारताच्या बँगलोरमध्ये आत्म्याने परिपूर्ण, अभिषिक्त, सक्रिय सेवेत सहभागी प्रशिक्षणआणि सिद्धांताच्या दृष्टीने योग्य व परमेश्वराच्या वचनाच्या बौद्धिक दृष्टीने प्रेरणादायक अभ्यासासह पवित्र आत्म्याच्या अलौकिक सामर्थ्यात विद्यार्थ्यांस सेवेसाठी तयार करते. आम्ही सेवेसाठी संपूर्ण व्यक्तिमत्त्वाच्या विकासावर विश्वास ठेवतो. तसेच या प्रशिक्षणात ईश्वरीय चारित्र्य, परमेश्वराच्या वचनाचा गंभीर पाया, आणि चिन्ह, चमत्कार व अद्भुत कृत्ये यावर जोर दिला जातो – सर्वकाही प्रभुच्या निकट सान्निध्यात प्रवाहित होते.

एपीसी-बीसी मध्ये, योग्य शिक्षणाशिवाय, आम्ही प्रत्यक्षपणे देवाचे प्रेम, अभिषेक आणि पवित्र आत्म्याचे सान्निध्य आणि देवाच्या अलौकिक कार्यावर जोर देतो. अनेक तरूण स्त्रीपुरुषांनी हे प्रशिक्षण घेतले आहे आणि त्यांच्या आयुष्यात देवाचे पाचारण पूर्ण करण्यासाठी त्यांना सेवेत पाठविण्यात आले आहे.

पुढील तीन पदव्या दिल्या आहेत:

Theology and Christian Ministry (C.Th.) में एक वर्षीय प्रमाणपत्र अभ्यासक्रम

Theology and Christian Ministry (D.Th.) में दो वर्षीय प्रमाणपत्र अभ्यासक्रम

Bachelor in Theology and Christian Ministry (B.Th.) में तीन वर्षीय प्रमाणपत्र अभ्यासक्रम

दर आठवड्यास सोमवार ते शुक्रवार या दरम्यान सकाळी 9 ते दुपारी 1 वाजेपर्यंत वर्ग भरलेले असतात. विद्यार्थी, नोकरी करणारे आणि गृहिणी सर्व या वर्गांमध्ये उपस्थित राहू शकतात आणि दुपारी 1 नंतर कामावर जाऊ शकतात. तेथे राहण्याची इच्छा असलेल्या स्त्री आणि पुरुषांसाठी स्वतंत्र वसतिगृहांची सोय आहे. विद्यार्थी दर आठवड्यात दोन ते पाच तास क्षेत्रीय कार्य, विशेष परिसंवाद, दुपारी प्रार्थना आणि उपासना यात घालवतात. दुपारच्या सभा घरून येणार्या विद्यार्थ्यांसाठी ऐच्छिक आहेत. आठवड्याच्या शेवटी सर्व विद्यार्थ्यांना एक किंवा अधिक स्थानिक चर्चेमध्ये सेवा करण्यास प्रोत्साहित केले जाते.

कॉलेज, विविध कार्यक्रम, अभ्यासक्रम याबद्दल अधिक माहितीसाठी आणि अर्ज डाउनलोड करण्यासाठी कृपया या साइटला भेट द्या : apcwobiblecollege.org

APC-BC is accredited by the
Nations Association for
Theological Accreditation (NATA).

वचनबद्धता हा असा सद्गुण आहे जो आजच्या दिवसांत आढळून येणे अशक्य आहे, लौकिक जगात आणि मंडळीतही. आमच्यापैकी अनेक जण जे सोयीस्कर वाटते ते करू इच्छितात आणि वचनबद्ध लोकांचे आढळणे अशक्य आहे. वचनबद्धता किंवा बांधिलकी ही एक शिस्त आहे. ती आपण जाणूनबुजून केलेली निवड आहे.

बायबल आम्हाला वचनबद्ध राहण्याविषयी शिकविते. प्रभू येशूने म्हटले, “कोणीही दोन धन्यांची चाकरी करू शकत नाही, कारण तो एकाचा द्वेष करील व दुसऱ्यावर प्रीती करील; अथवा एकाशी निष्ठेने वागेल व दुसऱ्याला तुच्छ मानील. तुम्ही देवाची आणि धनाची चाकरी करू शकत नाही.” **(मत्तय 6:24). येशू येथे सूचित करतो की हा आमचा जन्मजात स्वभाव आहे. मनुष्य एकाच वेळी दोन गोष्टी पूर्ण करू शकत नाही ज्या एकमेकांच्या उलट आहेत.** या पुस्तकात वचनबद्धतेच्या सामर्थ्यावर जोर देण्यात आला आहे आणि आपण जे काही करता त्यात वचनबद्ध राहण्यास ते आपणास प्रेरित करील. **ही घटका आता वचनबद्ध राहण्याची आहे!**

आशीष रायचूर

**All Peoples Church & World Outreach**
# 319, 2nd Floor, 7th Main, HRBR Layout,
2nd Block, Kalyan Nagar, Bangalore 560 043
Karnataka, INDIA

Phone: +91-80-25452617
Email: contact@apcwo.org
Website: apcwo.org